स्व.खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती
स्पर्धेच्या नियमावलीत बदल करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : क्रीस्पर्धा-२०१२/(प्र.क्र.२२५/१२)/क्रीयुसे-२,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,**
**दिनांक : ३ नोव्हेंबर, २०१२**

**वाचा :-** (१) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग क्रमांक-राक्रीधो-२००३/प्र.क्र.७५/क्रीयुसे-२, दिनांक ८ मार्च,२००४,
(२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक-क्रीस्पर्धा-२१०६/(प्र.क्र.१८८/२००६)/क्रीयुसे-२, दिनांक २७ जुलै,२००६,
(३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक-राक्रीधो-२००३/प्र.क्र.७५/क्रीयुसे-२, दिनांक २३ एप्रिल,२००८,
(४) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक-क्रीस्पर्धा-२०११/(प्र.क्र.४५/११)/क्रीयुसे-२, दिनांक ३ जानेवारी,२०१२,
(५) आयुक्त, क्रीडा व युवकसेवा, पुणे यांचे पत्र क्रमांक-क्रीयुसे/खाजाचकस्प/१९०/११-१२/का.४, दिनांक १४ डिसेंबर,२०११.

**प्रस्तावना :-** महाराष्ट्राच्या क्रीडा संस्कृतीची जोपासना व वाढ होण्यासाठी विविध खेळांच्या माध्यमातून युवा पिढीला खेळाकडे आकृष्ट करणे व त्यांच्यातील क्रीडा गुणांना वाव देणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात कुस्तीसारख्या देशी खेळाबाबत ग्रामीण व शहरी भागात विशेष आवड व आत्मियता आहे. कुस्ती हा खेळ महाराष्ट्रात सर्वत्र खेळला जातो. देशातील इतर राज्यात व देशाबाहेरही कुस्ती खेळाचा प्रचार व प्रसार करण्यात महाराष्ट्रात सिंहाचा वाटा आहे. राज्याची कुस्ती खेळातील कामगिरी राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत उल्लेखनीय आहे.

ऑलिम्पिक पदक विजेते स्व.पैलवान खाशाबा जाधव यांनी कुस्ती क्षेत्रात केलेल्या कामगिरीचा गौरव म्हणून राष्ट्रीय स्तरावर त्यांच्या नावाने स्व.खाशाबा जाधव चषक कुस्ती स्पर्धा दरवर्षी आयोजित करण्यास उपरोक्त दिनांक ८.३.२००४ च्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आलेली आहे. तसेच या स्पर्धेच्या आयोजनासाठी देण्यात येणा-या प्रतिवर्ष रु.१९,५५,५००/- एवढ्या अनुदानामध्ये वाढ करुन ते प्रतिवर्ष रु.५०.०० लाख एवढे करण्यास

उपरोक्त दिनांक ३.१.२०१२ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. राज्यातील कुस्तीगीरांना प्रेरणा देण्याच्या दृष्टीने सदर स्पर्धा राष्ट्रीय स्तराऐवजी राज्य स्तरावर आयोजित करण्याचा तसेच या स्पर्धेत महिला गटाचा समावेश करुन स्पर्धेच्या प्रचलित नियमावलीमध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता व त्याबाबत आता शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे :-

**: <u>शा स न नि र्ण य</u> :** उपरोल्लेखित दिनांक ८.३.२००४ चा शासन निर्णय अधिक्रमित करुन महाराष्ट्रात राज्यस्तरावर पुरुष व महिलांसाठी दरवर्षी "स्व.खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती" आयोजित करण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत असून, या स्पर्धेच्या सोबतच्या परिशिष्ट-"अ" मधील सुधारित नियमावलीस शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

तसेच स्व.खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती क्रीडा स्पर्धेसाठी सोबतच्या परिशिष्ट-"ब" अनुसार बाबनिहाय खर्चास तसेच परिशिष्ट-"क" अनुसार विविध समित्या गठीत करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. या स्पर्धेसाठी होणारा खर्च मुख्य लेखाशीर्ष "२२०४-क्रीडा व युवकसेवा-१०४-क्रीडा व खेळ-योजनेतर योजना-(२६)-कुस्ती स्पर्धा (२६) (०१)- स्व.खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती क्रीडा स्पर्धा-३१-सहाय्यक अनुदाने संगणक क्रमांक-(२२०४ २०३ ७)" याखाली खर्ची टाकण्यात यावा व त्याअंतर्गत त्या त्या वर्षी केलेल्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय सन२०१२-१३ या वर्षापासून आयोजित केल्या जाणा-या स्पर्धांसाठी लागू होईल.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर **(www.maharashtra. gov.in)** उपलब्ध करण्यात आला असून त्याचा **संगणक सांकेतांक क्रमांक- २०१२११०३१५४७३४३९२१** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सहपत्र : परिशिष्ट-अ,ब व क

( कि. शां. परब )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

(१) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,

(२) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,

(३) महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ व २, मुंबई / नागपूर,

(४) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१ व २, मुंबई / नागपूर,

(५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
(६) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
(७) सचिव, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद (संचालनालयामार्फत),
(८) वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई,
(९) आयुक्त, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,
(१०) सर्व विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा (संचालनालयामार्फत),
(११) सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी,
(१२) मा.मंत्री (क्रीडा) यांचे खाजगी सचिव,
(१३) मा.राज्यमंत्री (क्रीडा) यांचे खाजगी सचिव,
(१४) अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक,
(१५) निवड नस्ती (क्रीयुसे-२).

**: प रि शि ष्ट-"अ" :**

**शासन निर्णय क्रमांक- क्रीस्पर्धा-२०१२/(प्र.क्र.२२५/१२)/क्रीयुसे-२, दिनांक ३ नोव्हेंबर,२०१२ चे सहपत्र**

**स्व.खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती** स्पर्धेची नियमावली

**नियम-१** :- **शीर्षक** :- या नियमांना स्व.खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा नियम, २०१२ असे संबोधण्यात यावे.

**नियम-२** :- **उद्दिष्ट** :- राज्यातील कुस्तीगीरांना राज्य स्पर्धेत खेळण्याची जास्तीत जास्त संधी प्राप्त व्हावी तसेच त्यांना व क्रीडाप्रेमी प्रेक्षकांना दर्जेदार खेळाडूंचे कौशल्य व खेळ पाहण्यास मिळावा असे या स्पर्धेचे उद्दिष्ट आहे.

**नियम-३** :- **स्पर्धेचे स्वरुप व निकष** :- (अ) या स्पर्धेमध्ये महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेमार्फत दरवर्षी आयोजित करण्यात येणा-या वरिष्ठ गट (सिनिअर) राज्य अजिंक्यपद स्पर्धेमध्ये (अधिवेशनात) गुणानुक्रमे प्रथम ९ स्थानावर असलेले जिल्हा तालीम संघाचे ९ संघ व ज्या जिल्ह्यामध्ये सदर स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे त्या जिल्ह्याचा एक प्रातिनिधीक संघ असे एकूण १० संघ प्रत्येकी फ्री स्टाइल, ग्रीको रोमन व महिला या गटात स्पर्धेत सहभागी होण्यासाठी पात्र राहतील,

(ब) आयोजक जिल्ह्याचा संघ जर प्रथम ९ क्रमांकात असेल तर राज्य अजिंक्यपद स्पर्धेमधील गुणानुक्रमे १० व्या क्रमांकाचा संघ स्पर्धेत सहभागी होण्यास पात्र राहील,

(क) प्रत्येक संघात आंतरराष्ट्रीय कुस्ती महासंघाने निश्चित केलेल्या वजन गटानुसार फ्री स्टाइल-७, ग्रीको रोमन-७, महिला-७, व्यवस्थापक-३ व मार्गदर्शक-३ अशा एकूण २७ जणांचा समावेश राहील.

**नियम-४** :- **स्पर्धेसाठी आर्थिक तरतूद व स्पर्धेच्या खर्चाचा तपशील** :- या स्पर्धेसाठी प्रतिवर्षी रु.५०.०० लाख एवढी तरतूद करण्यात यावी. स्पर्धेच्या एकूण खर्चाचा तपशील सोबतच्या परिशिष्ट-"ब" मध्ये देण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे स्पर्धेसाठी बाबनिहाय खर्च करण्यात यावा.

**नियम-५** :- **पुरस्काराचे स्वरुप** :- (अ) सर्वाधिक गुण प्राप्त करणा-या राज्याच्या संघास स्व.खाशाबा जाधव चषक देण्यात येईल. हा चषक फिरता असेल तथापि, विजयी संघास त्या चषकाची प्रतिकृती देण्यात येईल. चषकासाठी होणा-या खर्चाची रक्कम संघाला रोख स्वरुपात देण्यात येणार नाही.

(ब) आंतरराष्ट्रीय कुस्ती महासंघाने निश्चित केलेल्या प्रत्येक वजन गटातील प्रथम, द्वितीय व तृतीय कुस्तीगीरांना अनुक्रमे सुवर्ण, रौप्य व कांस्य पदक देण्यात येईल. पदकाचे स्वरुप खालील प्रमाणे असेल :-

(१) व्यास ६ सें.मी. व जाडी ५ मि.मी.

(२) पदकावर एका बाजूस स्व.खाशाबा जाधव यांचे त्रिमिती चित्र व दुस-या बाजूस महाराष्ट्र शासनाचा त्रिमिती लामणदिवा असेल.

(३) पदक तांब्याच्या धातूचे असेल.

(४) पदकास सुवर्ण, रौप्य व कांस्य अशा तीन प्रकारचा मुलामा देण्यात येईल.

(५) प्रत्येक पदकास १ मीटर लांबीची व अर्धा इंच रुंदीची रिबन वापरावी. सुवर्ण पदकास लाल रंगाची, रौप्य पदकास गर्द निळ्या रंगाची व कांस्य पदकास गर्द पिवळ्या रंगाची रिबन वापरावी.

(क) फ्री स्टाइल, ग्रीको रोमन व महिला गटातील प्राविण्य प्राप्त खेळाडूंना परिशिष्ट-"ब" मध्ये नमूद केल्याप्रमाणे वजन गटनिहाय रोख बक्षिसे देण्यात येतील.

(ड) स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडू व अधिका-यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येतील. तसेच प्रत्येक वजन गटात प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक विजयी संघातील खेळाडूंना गुणवत्ता प्रमाणपत्र देण्यात येतील. सदर प्रमाणपत्रांवर जिल्हाधिकारी तथा आयोजन समितीचे कार्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे सचिव, विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा व संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या स्वाक्ष-या राहतील.

**<u>नियम-६</u>** :- **<u>आहरण व संवितरण अधिकारी</u>** :- या स्पर्धेसाठी आयुक्त/संचालक, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

**<u>नियम-७</u>** :- **<u>स्पर्धेसाठी गठीत करावयाच्या समित्या</u>** :- या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी गठीत करावयाच्या विविध समित्या सोबतच्या परिशिष्ट-"क" प्रमाणे राहतील.

**<u>नियम-८</u>** :- **<u>आर्थिक व्यवहार पध्दती</u>** :- **(अ)** या स्पर्धेसाठी शासनाने मंजूर केलेली रक्कम रु.५०.०० लाख आयोजन समितीकडे अनुदान स्वरुपात देण्यात येईल व आयोजन समितीच्या नावे बँकेत खाते उघडून त्या खात्याचा व्यवहार जिल्हाधिकारी तथा आयोजन समितीचे कार्याध्यक्ष यांच्या मान्यतेने कार्याध्यक्ष, आयोजन सचिव व संबंधित विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा तथा कोषाध्यक्ष यांच्यापैकी दोघांच्या स्वाक्षरीने करण्यात येईल,

(ब) या स्पर्धा महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे सचिव यांच्यामार्फत आयोजित करण्यात येत असल्याने परिशिष्ट-"ब" मध्ये दर्शविलेली रक्कम रु.५०.०० लाख परिशिष्ट-"क" मधील आयोजन समितीस अनुदान म्हणून देण्यात येईल,

(क) स्पर्धेचे आयोजन पूर्ण झाल्यानंतर आयोजन समितीने दोन महिन्याच्या आत मंजूर अनुदानाचे लेखा परीक्षण करुन अनुदान विनियोग प्रमाणपत्र, स्पर्धेच्या खर्चाचा अहवाल व स्पर्धेचा सविस्तर अहवाल क्रीडा व युवकसेवा संचालनालयास सादर करणे आवश्यक राहील. अनुदानाची काही रक्कम शिल्लक राहिल्यास ती चलनाद्वारे शासनास परत करण्यात यावी,

(ड) अनुदानाव्यतिरिक्त अधिक खर्च झाल्यास तो आयोजन समितीने करावा,

(इ) शासनाने मंजूर केलेल्या अनुदान रकमेव्यतिरिक्त आयोजन समितीस अतिरिक्त आर्थिक निधी उभारता येईल.

**<u>नियम-९</u>** :- **<u>स्पर्धा तांत्रिक बाबी</u>** :- स्पर्धेत सहभागी होणा-या राज्याच्या कुस्तीगीरांचे वजन गटानुसार प्रत्यक्ष सामने आयोजनाची तांत्रिक जबाबदारी महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेची असेल.

**<u>नियम-१०</u>** :- **<u>सर्वसाधारण व्यवस्था</u>** :- निवास व भोजन व्यवस्था, प्रेक्षक व्यवस्था, वाहतूक व्यवस्था, प्रसिध्दी व अन्य व्यवस्थापकीय बाबींची जबाबदारी संबंधित समित्यांची असेल,

**<u>नियम-११</u>** :- **<u>स्पर्धेत भाग घेणारे संघ व त्यांच्यासाठी सुविधा</u>** :- या स्पर्धेत महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेमार्फत दरवर्षी आयोजित करण्यात येणा-या वरिष्ठ गट (सिनियर) राज्य अजिंक्यपद स्पर्धेमध्ये (अधिवेशनात) गुणानुक्रमे प्रथम ९ स्थानावर असलेले जिल्हा तालीम संघाचे ९ संघ व ज्या जिल्ह्यामध्ये सदर स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे त्या जिल्ह्याचा १ प्रातिनिधीक संघ असे प्रत्येकी १० प्रमाणे एकूण ३० संघ फ्री स्टाइल, ग्रीको रोमन व महिला या गटात सहभागी होतील. या संघांना दुस-या वर्गाचे रेल्वे भाडे अथवा ज्याठिकाणी रेल्वे उपलब्ध नसेल त्याठिकाणी जाण्या येण्याचे निमआराम बस भाडे देण्यात येईल. तसेच स्थानिक वाहतूक व्यवस्था आयोजन समितीतर्फे पुरविण्यात येईल. निवास व भोजनाची मोफत व्यवस्था शासनाच्यावतीने आयोजन समितीमार्फत करण्यात येईल.

**<u>नियम-१२</u> :-** <u>सर्वसाधारण</u> **:- (I)** आयोजन समितीच्या पहिल्या बैठकीत स्पर्धेचे स्वरुप व अंदाजपत्रक मंजूर करुन घेण्यात येईल.

(II) स्व.खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती क्रीडा स्पर्धा ज्या जिल्ह्यात होईल त्या जिल्ह्याचे व विभागाचे संबंधित अधिकारी समितीचे सदस्य असतील.

(III) स्पर्धेसाठी नेमण्यात येणा-या तांत्रिक अधिका-यांचा प्रवास खर्च, निवास व भोजन खर्च, स्थानिक वाहतूक खर्च महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या नियमाप्रमाणे परिशिष्ट-"ब"मध्ये नमूद केल्यानुसार शासनाच्यावतीने आयोजन समितीतर्फे करण्यात येईल. दैनंदिन कार्यालयीन कामासाठी आवश्यक तो कर्मचारीवर्ग आयोजन समितीस नियुक्त करता येईल.

(IV) या स्पर्धेचे आयोजन शक्यतो प्रत्येक वर्षी जानेवारी महिन्यात करण्यात यावे. तत्पूर्वी महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेने त्यांच्या राज्यस्तरीय वरिष्ठ गटाच्या क्रीडा स्पर्धेचे आयोजन पूर्ण करावे.

(V) संघटनेने आयोजित केलेल्या वरिष्ठ गटाच्या क्रीडा स्पर्धेमध्ये ज्या जिल्ह्याच्या खेळाडूंनी राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धेत सहभाग घेतलेला आहे अशाच खेळाडूंना स्पर्धेत प्रवेश देण्यात यावा.

(VI) परिशिष्ट-"ब" मधील खर्चाच्या बाबींमधील रु.५०.०० लाखाच्या मर्यादेत बक्षिसाच्या रकमेव्यतिरिक्त उर्वरित रक्कम आयुक्त/संचालक, क्रीडा व युवकसेवा, पुणे यांच्या मान्यतेने इतर बाबींवर खर्च करता येईल.

(VII) स्पर्धेचे आयोजन भारतीय कुस्तीगीर महासंघाच्या नियमाप्रमाणे करण्यात येईल.

**<u>नियम-१३</u>** :- <u>नियम शिथिल करणे / बदल करणे</u> :- या नियमावलीमधील कोणताही नियम शिथिल करणे त्यात अंशत: किंवा पूर्णत: बदल करणे, नवीन नियम समाविष्ट करणे याबाबतचे सर्व अधिकार शासनास राहतील.

-------

**: प रि शि ष्ट-"ब" :**

**शासन निर्णय क्रमांक- क्रीस्पर्धा-२०१२/(प्र.क्र.२२५/१२)/क्रीयुसे-२, दिनांक ३ नोव्हेंबर,२०१२ चे सहपत्र**

**स्व.खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती** स्पर्धेच्या बाबनिहाय खर्चाचा तपशील

| अ.क्र. | बाब | बाबनिहाय खर्च |
|---|---|---|
| १ | सहभागी संघ - फ्री स्टाईल १० संघ, ग्रीको रोमन १० संघ, मुलींचे १० संघ असे एकूण ३० संघ. प्रत्येक संघामध्ये ०७ खेळाडू, १ क्रीडा मार्गदर्शक व १ व्यवस्थापक असा एकूण ०९ जणांचा समावेश राहील. (३० X ९ = २७०) | - |
| २ | सरपंच, पंच, अधिकारी व शासकीय अधिकारी, कर्मचारी यांची संख्या १०० | - |
| ३ | स्पर्धेचा कालावधी एकूण ५ दिवस, ३ दिवस प्रत्यक्ष स्पर्धा, एक दिवस स्पर्धेपूर्वी व एक दिवस स्पर्धेनंतर | - |
| ४ | **प्रवास खर्च जाणे-येणे** :- खेळाडू, व्यवस्थापक, मार्गदर्शक, पंच, अधिकारी, संघटना पदाधिकारी, शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना अंदाजे रु.५००/- प्रमाणे दुस-या वर्गाचे रेल्वे भाडे / ज्याठिकाणी रेल्वे उपलब्ध नसेल त्याठिकाणी जाण्यायेण्याचे निमआराम बसचे भाडे, शासकीय अधिकारी यांना शासन नियमाप्रमाणे (५०० X ३७०) | रु.१,८५,००० |
| ५ | खेळाडू, व्यवस्थापक, मार्गदर्शक, पंच, अधिकारी, संघटना पदाधिकारी, शासकीय अधिकारी यांचा भोजन खर्च दरदिवशी प्रत्येकी रु.२५०/- प्रमाणे ५ दिवस (२५० X ३७० X ५) | रु.४,६२,५०० |
| ६ | खेळाडू, व्यवस्थापक, मार्गदर्शक, पंच, अधिकारी, संघटना पदाधिकारी, शासकीय अधिकारी यांचा निवास रु.१५०/- प्रमाणे ५ दिवस (१५० X ३७० X ५) | रु.२,७७,५०० |
| ७ | स्व.खाशाबा जाधव चषक प्रतिकृतीचा व मेडलचा खर्च<br>प्रथम क्रमांक (२ पुरुष व १ महिला) एकूण - ३ X २०,००० = ६०,०००<br>द्वितीय क्रमांक (२ पुरुष व १ महिला) एकूण - ३ X १५,००० = ४५,०००<br>तृतीय क्रमांक (२ पुरुष व १ महिला) एकूण - ३ X १०,००० = ३०,००० | रु.१,३५,००० |

<table>
<tr>
<td>८</td>
<td>
<u>प्राविण्यधारक खेळाडूंना रोख बक्षिसे (फ्री स्टाईल)</u>
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>वजनगट</th><th>प्रथम क्रमांक</th><th>द्वितीय क्रमांक</th><th>तृतीय क्रमांक</th><th>एकूण</th></tr>
<tr><td>१</td><td>सर्वोच्च गट</td><td>७५,०००</td><td>५०,०००</td><td>२५,०००<br>२५,०००</td><td>१७५,०००</td></tr>
<tr><td>२</td><td>इतर सहा</td><td>४०,०००</td><td>३०,०००</td><td>२०,०००<br>२०,०००</td><td>६६०,०००</td></tr>
<tr><td>३</td><td>सहभाग</td><td colspan="3">४२ x ४०००</td><td>१६८,०००</td></tr>
<tr><td colspan="5">एकूण :</td><td>१,००३,०००</td></tr>
</table>
</td>
<td rowspan="3">रु.२८,९४,०००</td>
</tr>
<tr>
<td></td>
<td>
<u>प्राविण्यधारक खेळाडूंना रोख बक्षिसे (ग्रीको रोमन)</u>
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>वजनगट</th><th>प्रथम क्रमांक</th><th>द्वितीय क्रमांक</th><th>तृतीय क्रमांक</th><th>एकूण</th></tr>
<tr><td>१</td><td>सर्वोच्च गट</td><td>७५,०००</td><td>५०,०००</td><td>२५,०००<br>२५,०००</td><td>१७५,०००</td></tr>
<tr><td>२</td><td>इतर सहा</td><td>४०,०००</td><td>३०,०००</td><td>२०,०००<br>२०,०००</td><td>६६०,०००</td></tr>
<tr><td>३</td><td>सहभाग</td><td colspan="3">४२ x ४०००</td><td>१६८,०००</td></tr>
<tr><td colspan="5">एकूण :</td><td>१,००३,०००</td></tr>
</table>
</td>
</tr>
<tr>
<td></td>
<td>
<u>प्राविण्यधारक खेळाडूंना रोख बक्षिसे (महिला गट)</u>
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>वजनगट</th><th>प्रथम क्रमांक</th><th>द्वितीय क्रमांक</th><th>तृतीय क्रमांक</th><th>एकूण</th></tr>
<tr><td>१</td><td>सर्वोच्च गट</td><td>५०,०००</td><td>४०,०००</td><td>१५,०००<br>१५,०००</td><td>१२०,०००</td></tr>
<tr><td>२</td><td>इतर सहा</td><td>४०,०००</td><td>३०,०००</td><td>१५,०००<br>१५,०००</td><td>६००,०००</td></tr>
<tr><td>३</td><td>सहभाग</td><td colspan="3">४२ x ४०००</td><td>१६८,०००</td></tr>
<tr><td colspan="5">एकूण :</td><td>८८८,०००</td></tr>
</table>
</td>
</tr>
<tr>
<td>९</td>
<td>सरपंच, पंच, सामना अधिकारी, संघटना प्रतिनिधी व शासकीय अधिकारी एकूण १०० यांना मानधन रु.५००/- प्रमाणे ५ दिवस (१०० x ५०० x ५)</td>
<td>रु.२,५०,०००</td>
</tr>
<tr>
<td>१०</td>
<td>मैदानासाठी व स्पर्धेच्या कामासाठी २५ स्वयंसेवकांचे मानधन रु.२५०/- प्रमाणे ५ दिवस (२५० x २५ x ५)</td>
<td>रु.३१,२५०</td>
</tr>
<tr>
<td>११</td>
<td>प्रेक्षक गॅलरी, क्रीडांगणावरील प्रकाश झोतासाठी व्यवस्था, विद्युत व्यवस्था, शामियाने, व्हीआयपी आसन व्यवस्था, निमंत्रितांची आसन व्यवस्था, स्टेज, स्पर्धेसाठी आराखडा तयार करणे व इतर अनुषंगिक बाबींचा खर्च</td>
<td>रु.४,५०,०००</td>
</tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| १२ | **सादिल खर्च** :- उद्‌घाटन व समारोप, रोषणाई, प्रसिध्दी, बॅनर्स, साऊंड सिस्टीम, व्हिडीओ रेकॉर्डिंग व फोटो छपाई, प्रमाणपत्र छपाई, झेरॉक्स, आवश्यक क्रीडा साहित्य, स्टेशनरी, संगणक/फॅक्स, टेलिफोन, वाहतूक खर्च, चहापान व स्पर्धेच्या अनुषंगाने होणारा इतर खर्च इत्यादी | रु.३,१४,७५० |
| | | रु.५०,००,००० |

**: प रि शि ष्ट-"क" :**

**शासन निर्णय क्रमांक-क्रीस्पर्धा-२०१२/(प्र.क्र.२२५/१२)/क्रीयुसे-२, दिनांक ३ नोव्हेंबर,२०१२ चे सहपत्र**

**स्व.खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेच्या आयोजनासंबंधात गठीत करावयाच्या विविध समित्या**

**स्व.खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन यशस्वी होण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणे विविध समित्या गठीत करण्यात याव्यात :-**

(अ) **उच्चस्तरीय समिती (High Power Committee)**

सदर स्पर्धेचे सर्वसाधारण धोरण व संनियंत्रण करणे, स्पर्धेचे ठिकाण ठरविणे आणि स्पर्धेसाठी आर्थिक तरतूद उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणे उच्चस्तरीय समिती नेमण्यात यावी :-

| | | |
|---|---|---|
| १ | मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) | अध्यक्ष |
| २ | राज्यमंत्री (क्रीडा व युवक कल्याण) | उपाध्यक्ष |
| ३ | अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा) | सदस्य |
| ४ | प्रधान सचिव (वित्त) | सदस्य |
| ५ | सचिव / प्रतिनिधी महाराष्ट्र राज्य / विदर्भ राज्य कबड्डी असोसिएशन | सदस्य |
| ६ | आयुक्त / संचालक, क्रीडा व युवकसेवा, पुणे | सदस्य सचिव |

(ब) **आयोजन समिती**

स्पर्धेचे आयोजन यशस्वी होण्याच्या दृष्टीने स्पर्धेच्या आयोजनासंदर्भात पूर्वतयारीसाठी खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात यावी :-

| | | |
|---|---|---|
| १ | संबंधित जिल्ह्याचे पालक मंत्री | अध्यक्ष |
| २ | संबंधित जिल्ह्याचे जिल्हा परिषद अध्यक्ष | उपाध्यक्ष |
| ३ | स्थानिक आमदार | उपाध्यक्ष |
| ४ | शहराचे महापौर / नगराध्यक्ष | उपाध्यक्ष |
| ५ | संबंधित जिल्हाधिकारी | कार्याध्यक्ष |
| ६ | सचिव, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद | आयोजन सचिव |
| ७ | संबंधित उपसंचालक (क्रीडा व युवकसेवा) | कोषाध्यक्ष |
| ८ | संबंधित जिल्हा कुस्ती संघटनेचा प्रतिनिधी | सदस्य |
| ९ | संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी | संयुक्त सचिव |
| १० | महापालिका आयुक्तांचे / मुख्याधिकारी, नगरपालिका यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ११ | पोलीस आयुक्तांचे / पोलीस अधीक्षकांचे प्रतिनिधी | सदस्य |
| १२ | जिल्हा माहिती अधिकारी | सदस्य |
| १३ | जिल्हा आरोग्य अधिकारी | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| १४ | महाविद्यालयाचे प्राचार्य (दोन) | सदस्य |
| १५ | जिल्हा क्रीडा परिषदेचे सदस्य (दोन) | सदस्य |
| १६ | जिल्हा परिषद सदस्य / नगरसेवक (दोन) | सदस्य |
| १७ | आकाशवाणी / दूरदर्शन प्रतिनिधी | सदस्य |

आवश्यकतेनुसार या समितीमध्ये विशेष निमंत्रक म्हणून सभासद घेण्याचा अधिकार अध्यक्षांना व कार्याध्यक्षांना राहील.

**उपसमित्या** :-

याशिवाय स्पर्धा यशस्वीरितीने पार पाडण्यासाठी आयोजन समितीच्या अधिपत्याखाली खालील उप समित्या नेमण्यात याव्यात :-

(१) तांत्रिक समिती (क्रीडांगण व सामने)

(२) निवास व्यवस्था समिती

(३) भोजन व्यवस्था समिती

(४) प्रसिध्दी व स्मरणिका समिती

(५) वाहतूक व्यवस्था समिती

(६) स्वयंसेवक समिती

(७) उद्घाटन / समारोप समारंभ समिती

(८) वैद्यकीय सेवा समिती

आयोजन समिती उपयुक्त ठरणा-या व्यक्तींची वरील उपसमित्यांमध्ये सदस्य म्हणून नियुक्ती करेल. तसेच आयोजन समितीस आवश्यकतेनुसार वरील उपसमित्यांमध्ये वाढ करता येईल.

--------